## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२४/०५/२०१९
## दि.२३/०५/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ३८४/१९,भादविक २७९,३०४(अ),४२७,मोव्हेॲक्ट १८४,१३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | रविंद्र खरात,वय-३७ वर्ष,रा.अंगणवाडी,बोपखेल,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोपेडचालक महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०५/२०१९ रोजी २२/०० ते १०/३० वा. चे दरम्यान सहयाद्री हॉस्पिटल समोरील रोडने शासकीय वसाहत,शास्त्रीनगर येथील समोरील रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा वाढदिवस असल्याने ते त्यांचा मित्र महादेव श्रीराम धुरंधर,वय-३५ वर्ष रा.गांधीनगर,येरवडा,पुणे याचेसह मोटार सायकलवर पाठीमागे बसुन,महादेव हा दुचाकी चालवित सहयाद्री हॉस्पिटल समोरील रोडने नमुद ठिकाणी येत असताना,त्यांचे विरुध्द दिशेने एक अनोळखी महिला मोपेड चालक हिने तीचे वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने अविचाराने व भरधाव वेगाने चालवुन,फिर्यादी यांचे गाडीस धडक देवुन, दोघांना खाली पाडुन,फिर्यादीस किरकोळ जखमी करून,महादेव श्रीराम धुरंधर यांना छातीला व डोक्यास गंभीर दुखापत करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. (फिर्यादी रविंद्र खरात व मोटार सायकल चालक मयत महादेव धुरंधर यांनी हेल्मेट घातले नव्हते.) |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. आर.बी.गिरमकर ८८०५५७३७३३ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ३७८/१९,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | अविनाश ताम्हणे,वय-६८ वर्ष,रा.कात्रज कोढवा रोड,कात्रज,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात व्यक्ती |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०२/२०१९ रोजीपासुन ते दि.१२/०२/२०१९ रोजीचे कालावधीत वेग-वेगळ्या ठिकाणाहुन ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे बॅंकेचे डेबिट कार्ड कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,क्लोंनिग करुन त्यांचे बॅंकेचे खात्यातुन,वेग-वेगळ्या ठिकाणाहुन एकुण १,१९,५००/- रुपये काढुन घेवुन,फिर्यादी यांची ऑनलाईन फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) विष्णु ताम्हाणे ९८२३१९५०९४ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे २६०/१९,भादविक ४०६,४२० |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-४१,रा.अजमेरा,पिंपरी,पुणे |
| **आरोपी** | हॉस्पीटलचा कर्मचारी सांगणारा एक अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०५/२०१९ रोजी ११/१० ते ११/३० वा.चे दरम्यान शिवाजीनगर,पुणे येथील एक नामांकीत हॉस्पिटलचे एक्स-रे विभाग मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची आई हया शिवाजीनगर येथील नामांकीत हॉस्पिटल मध्ये एक्स-रे विभाग,पुणे येथे गुडघेदुखी व पाठदुखीचा त्रास होत असल्यामुळे एक्स-रे काढण्यासाठी गेल्या असताना,तेथील एका अनोळखी इसमाने मी या हॉस्पिटलचा कर्मचारी आहे असे भासवून, फिर्यादी यांची आई यांना आंतमध्ये घेऊन जाऊन,एक्स-रे काढण्यासाठी त्यांचे गळयातील सोन्याची माळ काढण्यास सांगितल्याने,त्यांनी त्यांचे गळयातील सोन्याची माळ काढून विश्वासाने,सदर इसमाकडे सोपवुन,तीचे मुलीकडे देण्यास सांगितले असता,त्याने सोन्याची माळ मुलीकडे न देता,त्याचा स्वतःचे फायद्याकरीता अपहार करून,फिर्यादी यांचे आईची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. के.पी.पाटील ९९२२९५७२७३ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | शिवाजीनगर पो स्टे २६१/१९,भादविक ४०६,४२०,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-२४,रा.पिंपरी कॉलनी,पुणे |
| **आरोपी** | अनोळखी अज्ञात इसम व महिला |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२३/०५/२०१९ रोजी ०४/०० वा. दळवी हॉस्पिटल समोरील इराणी गल्लीकडे जाणा-या रोडवर शिवाजीनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद अनोळखी इसमाने व त्याची बहिण सांगणा-या एका महिलेने फिर्यादी यांना २,०५,०००/- रुपयेच्या फाटक्या नोटा बदुलन देण्याचे बहाण्याने फिर्यादी यांचे दुकानावर येवुन,फिर्यादी यांनी फाटक्या नोटांच्या बदल्यात त्यांना १,००,०००/- रुपये रोख दिले असता,सदर इसम व महिला यांनी आपसात संगनमत करून,सदर पैसे व फाटक्या नोटा यातील काहीही फिर्यादी यांना न देता त्यांची १,००,०००/- रुची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एच.एस.गिरी ९४०३६२०२६७ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे १२७/१९,भादविक ४१९,४२०,५०७,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-४३ वर्षे,रा.पुणे |
| **आरोपी** | एक अज्ञात महीला व एक अज्ञात पुरुष |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/०४/२०१९ रोजी १७/३० वा. एस.बी.आय.मनी ट्रान्सफर कर्वेनगर,कॅनॅल रोड,थोरात कॉलनी याठीकाणाहुन |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात इसमाने फिर्यादी यांचेसोबत फेसबुकवर मैत्री करुन,त्यांना विश्वासात घेऊन, त्यांना गिफ्ट पाठविण्याच्या बहाण्याने,तसेच दिल्ली कस्टमच्या नावाने नमुद महिला मोबाईलधारकाने फिर्यादी यांना फोन करून ४५,०००/- हजार रुपये दिल्ली येथील बँकेचे खात्यावर भरण्यास सांगुन,फिर्यादी यांची फसवणुक केली आहे. तसेच त्यांचे मोबईल नंबरवरून फिर्यादी यांना धमकीचे मेसेज येत आहेत. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. ए.डी.घोडके ९०११११५६६६ |

६

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ४९२/१९,भादविक ४०६,४२० |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२८ वर्षे,रा.बाणेर रोड,पुणे |
| **आरोपी** | एक इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०३/२०१८ ते दि.२३/०५/२०१९ रोजीचे कालावधीत स्टेट बँक ऑफ इंडीया,सेनापती बापट रोड शाखा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन,फिर्यादीस त्यांचे मालकीचे मोरया स्विस ग्रुप या कंपनी मध्ये नमुद कालावधी मध्ये गुंतवणुक करण्यास भाग पाडुन,फिर्यादी यांनी गुंतवणुक केलेली ४२ लाख ८० हजार रूपये रक्कम अथवा सदर रकमेच्या किंमतीची सोन्याची बिस्कीटे ही फिर्यादी यांना न देता,फिर्यादी यांनी केलेली गुंतवणुक रक्कम ही सदर इसमाने स्वतःचे फायदयाकरीता वापरुन फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. (सदरचा गुन्हा हा तक्रारी अर्जावरुन दाखल करण्यात आला आहे.) |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक, संगीता यादव, आर्थिक विभाग,गुन्हे शाखा,पुणे शहर ८१०८२५११०० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**